शिवाजी विदयापीठ,कोल्हापुर

दरपत्रक फॉर्म

१.साहित्याचा तपशील		: Polyester Thermal Lamination Roll
२.फर्मचे नाव		:
	पत्ता	:
३.दुरध्वनी क्रमांक		:
४.दरपत्रक फॉर्म भरून देण्याची अंतिम तारीख व वेळ		: १६.११.२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

प्रति,
मा.कुलसचिव,
शिवाजी विदयापीठ,कोल्हापूर

Polyester Thermal Lamination Roll

Size	Qty.	Price Per Peace	Total (Including with all taxes)
8.25" (210mm)Length	50		
2.50"(63mm)Width	100		
		Total Price	

अटी व शर्ती -

१. दर सर्व करासहीत विदयापीठ पोहच दयावेत.
२. दरपत्रकासोबत पुरवठा करण्यात येणाऱ्या लॅमिनेशन रोलच्या कंपनीचा फर्मच्या लेटरहेडवर उल्लेख करण्यात यावा.
३. दरपत्रक विदयापीठाच्या अटी व शर्तीनुसार असले पाहिजे. पुरवठादाराने स्वत:च्या अटी व शर्ती नमूद करू नये.
४. कोणतेही दरपत्रक अगर सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.कमी दराचेच दरपत्रक स्विकारणे कार्यालयावर बंधनकारक असणार नाही.
५. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर मुद्रणालयाच्या आवश्यकतेप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात येईल. पुरवठा जादा किंवा कमी देण्याचा अधिकार अथवा दरपत्रकातील साहित्याची खरेदी विभागून करण्याचा अधिकार कार्यालयाने राखून ठेवला आहे.
६. पुरवठा आदेश दिल्यानंतर ७ दिवसात पुरवठा करायचा आहे.पुरवठा ७ दिवसात न झाल्यास ७ दिवसानंतर देयकाच्या रकमेवर ०.५% प्रती आठवडा दंड आकारण्यात येईल.
७. पुरवठादाराने कार्यादेशानुसार 40 Micron जाडीचे लॅमिनेशन रोल पुरविणे बंधनकारक राहील. प्रत्यक्ष तपासणीमध्ये पुरवठा केलेल्या लॅमिनेशन रोलची जाडी निर्धारित 40 Micron पेक्षा कमी आढळल्यास एकूण देयकाच्या 5% रक्कम दंड आकारण्यात येईल.
८. पुरवठा आदेशापोटी आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही.पुरवठा पुर्ण झाल्यानंतर त्याचे देयक दोन प्रतीत आगाऊ पोहच पावतीसह दयावयाचे आहे.
९. आपणास दिलेल्या पुरवठा आदेशानूसार Lamination roll ची पुर्तता झाल्यानंतर सादर केलेल्या देयकापैकी ९७% रक्कम देयक देण्यात येईल व उर्वरित ३% सुरक्षा रक्कम म्हणून जमा करण्यात येईल. सदरची रक्कम हि ३ महिन्यांनतर परत देण्यात येईल.

१०. दरपत्रक सिलबंद लखोटयातून Techniqual Document & Commercial Document दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये देण्यात यावे. Techniqual Document मध्ये **शॉप ॲक्ट लायसन्स, जी.एस.टी. सर्टिफिकिट, पॅन कार्ड व फर्मच्या लेटरहेडवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा अर्ज स्वाक्षरी व शिक्क्यांसह देण्यात यावे.** सदर कागदपत्रे न दिल्यास दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही. Polyester Thermal Lamination roll चे दर Annexure ०१ मध्ये नमूद करून Commercial Document च्या लिफाफ्यामध्ये देण्यात यावे.

११. दरपत्रक विदयापीठ मुख्य इमारत आवक जावक विभाग खोली क्रं.१३८ मध्ये सिलबंद लखोटयातून Techniqual Document & Commercial Document या दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये देण्यात यावीत व लखोटयावर तसा उल्लेख करण्यात यावा. दरपत्रकावर **Polyester Thermal Lamination roll दरपत्रक (मुद्रणालय विभाग)** असा उल्लेख करून मा.कुलसचिव, शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर यांच्या नावे **दि.१६.११.२०२६** पर्यंत सादर करावीत.

१२. उपरोक्तवाबत कोणतीही समस्या उद्भवल्यास त्यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार प्रशासनाचा राहिल. तसेच सदर खरेदीसंदर्भात कायदेशीर विवाद कोल्हापूर कार्यक्षेत्राच्या अधीन असतील. विदयापीठाने दरपत्रक व तांत्रिक वर्णनामध्ये दिलेल्या उपरोक्त अटी व शर्ती मला मान्य असून मी **Polyester Thermal Lamination roll** साठी वरिलप्रमाणे दर सादर केलेले आहे.

विदयापीठाने दरपत्रक व तांत्रिक वर्णनामध्ये दिलेल्या उपरोक्त अटी व शर्ती मला मान्य असून मी Polyester Thermal Lamination roll साठी वरिलप्रमाणे दर सादर केलेले आहे.

दरपत्रकधारकाची सही व शिक्का